आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१५ ऑगस्ट २०२५ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- विकसित आणि समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी सर्वस्व अर्पण करण्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं स्वातंत्रदिनी लाल किल्ल्यावरुन आवाहन

- दिवाळीपूर्वी जीवनावश्यक वस्तूंवरचा जीएसटी कमी करण्याची प्रधानमंत्र्यांची घोषणा,  भविष्यातल्या सुधारणांसाठी कृतीदल जाहीर

- विकसित भारताच्या स्वप्नामध्ये विकसित महाराष्ट्राचं विशेष योगदान असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं प्रतिपादन, राज्यभरात स्वातंत्र्यदिनाचा उत्साह

**आणि**

- मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नाशिक महापालिका निवडणूक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि मनसे एकत्र लढवणार

**<><><><><>**

भारताला २०४७ पर्यंत विकसित करण्यासाठी आणि समृद्ध भारत निर्माण करण्यासाठी सर्वस्व अर्पण करुन काम करा, नवीन संधी निर्माण करा, आणि देशातल्या १४० कोटी नागरिकांना त्याचा लाभ मिळेल यासाठी प्रयत्न करा, असं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. ७९ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नवी दिल्लीत लाल किल्ल्यावर प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. त्यानंतर त्यांनी देशवासियांना संबोधित केलं. याविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड पॅकेज**

देशवासियांना संबोधित करताना सुरुवातीला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातल्या महापुरुषांना अभिवादन केलं तसंच ऑपरेशन सिंदूरमधे कर्तृत्व गाजवणाऱ्या सैनिकांचं कौतुक केलं. यापुढं दहशतवाद्यांनी आगळीक केल्यास सडेतोड उत्तर देऊ असा असा इशारा त्यांनी दिला.

**Byte - PM--NO-NUCLEAR-WARNING.mp3**

शत्रुच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देण्यासाठी स्वदेशी बनावटीच्या सुदर्शन चक्र मिशनची घोषणा प्रधानमंत्र्यांनी आज केली. देशाची सुरक्षायंत्रणा मजबूत करण्याच्या या मिशन अंतर्गत शत्रूचा हल्ला निकामी करुन त्यांना प्रत्युत्तर देण्याचं लक्ष्य आहे. शेतकरी, मच्छिमारांचं हित जपण्यासाठी सरकार कटीबद्ध आहे आणि त्यात तडजोड होईल, असा कुठलाही करार करणार नसल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी स्थानिक गोष्टींचा अवलंब करण्याचं आवाहन केलं.

**Byte - PM-LOCAL-FOR-VOCAL.mp3 (00-15-to end)**

नवनवीन औषधं, लढाऊ विमानांचं इंजिन देशात तयार करण्याचं आवाहन त्यांनी युवकांना केलं. दिवाळीपूर्वी जीएसटीमध्ये आमुलाग्र बदल करुन दैनंदिन उपयोगांच्या वस्तूंवरचे कर कमी करण्याची घोषणा प्रधानमंत्र्यांनी आजच्या भाषणात केली. यामुळं छोट्या आणि मध्यम उद्योगांना चालना मिळेल आणि अर्थव्यवस्थेच्या वाढीला

मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. गेल्या काहीवर्षात देशात कायदे, आयकर यासह इतर क्षेत्रात झालेल्या सुधारणांची आठवण प्रधानमंत्र्यांनी यावेळी देशातल्या नागरिकांना करुन दिली आणि भविष्यातल्या सुधारणांचं सुतोवाच केलं.

*Byte- (नेक्स्ट जनरेशन रिफॉर्म्स के लिए हमने एक टास्क फोर्स गठित करने का निर्णय किया है। यह टास्क फोर्स समय सीमा में इस काम को पूरा करें। वर्तमान नियम, कानून, नीतियां, रीतियां 21वीं सदी के अनुकूल, वैश्विक वातावरण में अनुकूल और भारत को 2047 में विकसित राष्ट्र बनाने के संदर्भ में नए सिरे से तैयार हो और उसका समय सीमा में अपना कार्य पूरा करने के लिए टास्क फोर्स की रचना की है।)*

आजपासून लागू होणाऱ्या प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजनेअंतर्गत पहिल्यांदा नोकरीला लागणाऱ्यांना सुमारे साडे ३ कोटी युवकांना १५ हजार रुपये सरकारकडून दिले जातील, असं ते म्हणाले. चालू वर्षअखेरपर्यंत स्वदेशी बनावटीची चिप बाजारात येईल, २०४७ पर्यंत अणूऊर्जा क्षमता १० पटीनं वाढेल असं ते म्हणाले. घुसखोरीच्या समस्येवर मात करण्यासाठी नव्या मिशनची तसंच पेट्रोल - डिझेलच्या आयातीवर होणारा खर्च कमी करण्यासाठी नव्या मोहिमेची सुरुवात करणार असल्याचं ते म्हणाले.

**PM--DEEP-WATER-EXPLORATION-MISSION**

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीच्या निमित्तानं विशेष कार्यक्रम सरकार सुरु करणार आहे, अशी घोषणा त्यांनी आज केली. लाल किल्ल्यावर आयोजित या कार्यक्रमात केंद्रीय मंत्री, वरिष्ठ अधिकारी, देशभरातून आमंत्रित केलेले मान्यवर आणि मोठ्या संख्येनं नागरिक उपस्थित होते. लाल किल्ल्यावर झालेल्या परेडमध्ये मूळची नागपूरची असलेल्या लेफ्टनंट कमांडर जुई भोपे यांनी पंतप्रधान रक्षक दलाच्या पथक प्रमुख म्हणून नेतृत्वाची धुरा सांभाळली होती. स्वातंत्र्यदिनाच्या निमित्तानं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन पुष्पांजली अर्पण केली.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा करांतर्गत येणाऱ्या सर्व वस्तूंवर ५ टक्के आणि १८ टक्के अशा दोन स्तरात दर निश्चित करावेत, असा प्रस्ताव अर्थमंत्रालयानं वस्तू आणि सेवा कर परिषदेला पाठवला आहे. या नव्या प्रणालीनुसार शेतीसाठी लागणाऱ्या अत्यावश्यक वस्तू, आरोग्याशी संबंधित वस्तू, हस्तकलेच्या वस्तू आणि विमा यांच्यावर ५ टक्के जीएसटी लागेल, तर इतर वस्तू १८ टक्के जीएसटीच्या स्तरात येतील. मात्र, सिगरेट, तंबाखू, साखरयुक्त पेयं आणि पानमसाला अशा आरोग्यासाठी हानीकारक असलेल्या वस्तूंवर आत्ताप्रमाणेच जास्त जीएसटी द्यावा लागेल.

**<><><><><>**

भारताच्या संपूर्ण विकास व्यवस्थेमध्ये महाराष्ट्र राज्य अतिशय वेगानं पुढे जात आहे. विकसित भारताच्या स्वप्नामध्ये विकसित महाराष्ट्र विशेष योगदान देत आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज केलं. मंत्रालयात मुख्य शासकीय ध्वजारोहणाच्या कार्यक्रमानंतर ते बोलत होते.

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

यावेळी त्यांनी राज्य सरकारकडून सुरू असलेल्या विविध विकासकामांची आणि योजनांची माहिती दिली. मुख्य सचिव राजेश कुमार, पोलीस महासंचालक

रश्मी शुक्ला यांच्यासह विविध वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुण्यातल्या विधानभवनात ध्वजारोहण करण्यात आलं. मुंबईतल्या विधान भवनात विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या हस्ते तर मुंबई उच्च न्यायालयात मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं.

**ठाण्यात** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. **बीड** जिल्ह्याच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचं प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वातंत्र्यदिनाच्या कार्यक्रमात केलं. राज्यभरात आज स्वातंत्र्य दिनाचा उत्साह दिसून आला. ठिकठिकाणी जिल्हा मुख्यालयात आणि इतर ठिकाणी पालकमंत्री तसंच अन्य मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. याचा सविस्तर वृत्तांत आपल्याला सव्वा ७ वाजता विशेष ध्वनिचित्रमध्ये ऐकता येईल.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि मनसे हे दोन्ही पक्ष मुंबई, नाशिक, ठाणे आणि कल्याण डोंबिवली या महानगरपालिकांच्या निवडणुका एकत्र येऊन लढवणार आहेत. खासदार संजय राऊत यांनी आज नाशिकमध्ये बातमीदारांशी बोलताना ही माहिती दिली. याशिवाय मुंबईतल्या बेस्ट कामगार पतपेढीच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांची युती होणार आहे. यासाठी दोन्ही पक्षांच्या कामगार सेनांचा संयुक्त उत्कर्ष पॅनेलचा मेळावा काल झाला.

**<><><><><>**

**राज्याच्या विविध भागात कालपासून जोरदार पाऊस सुरू आहे.**

सकाळपर्यंतच्या चोवीस तासात रत्नागिरी तालुक्यात सर्वाधिक पाऊस झाला. **सिंधुदुर्ग** जिल्ह्यात कुडाळ तसंच वैभववाडी तालुक्यात १००

मिलीलीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. **नांदेड** जिल्ह्यातल्या मुखेड, भोकर, उमरी, देगलूर, कंधार, लोहा, नायगाव, मुदखेड, हदगाव या तालुक्यांमधल्या मिळून सत्तावीस महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. विष्णुपुरी प्रकल्पाचे दोन्ही दरवाजे उघडून गोदावरी नदीत पाण्याचा विसर्ग सुरू आहे.

**लातूर** तसंच शिरुर अनंतपाळमध्ये सर्वाधिक पाऊस झाला. निम्न तेरणा धरणाचे पाणी पातळी ओलांडण्याची शक्यता असल्यानं नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

**जालना** शहर आणि जिल्ह्यात तसंच धुळ्यातही पाऊस सुरू आहे.

**<><><><>**

हा संपूर्ण आठवडा कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडेल, तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडेल, किनारपट्टीवर सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही अनेक ठिकाणी पाऊस पडेल, तर तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

पिंपरी-चिंचवडमधे आज विषारी वायुमुळे तीन जणांचा मृत्यू झाला. दुपारी भेळ चौकाजवळ दूरसंचार कंपनीच्या केबलची दुरुस्ती करण्यासाठी तीन कर्मचारी झाकण उघडून खड्ड्यात उतरले होते. त्यावेळी ही दुर्घटना झाली.

**<><><><>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं पुढच्या वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्यासाठीची कामं वेळेत पूर्ण व्हावी यासाठी कालबद्ध कृती आराखडा तयार करावा, असे आदेश कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी आज नाशिकमध्ये घेतलेल्या बैठकीत दिले. कामांची गुणवत्ता राखली जाईल याचीही दक्षता घ्यावी, असे आदेश त्यांनी दिले.

**<><><><>**

नाशिकच्या भारत प्रतिभूती मुद्रणालय आणि चलार्थ पत्र, या चलनी नोटा छापणाऱ्या मुद्रणालयासह देशातल्या नऊ मुद्रणालयांमधल्या  कामगारांना १६ हजार रुपये दिवाळी बोनस जाहीर झाला आहे.

**<><><><><>**

सातारा इथं भरवलेल्या जिल्हास्तरीय रानभाज्या महोत्सवाचं उद्घाटन पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी केलं. रानभाज्यांचं संवर्धन तसंच नागरिकांपर्यंत त्यांचं महत्व पोचवण्याचं काम कृषीविभागाने करावं, असं त्यांनी यावेळी सांगितलं. यवतमाळ इथंही जिल्हास्तरीय रानभाजी महोत्सव भरवला होता. पालकमंत्री संजय राठोड यांनी महोत्सवाचं उद्घाटन केलं.

**//<><><><><>//**